# पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

डॉ. एस. डी. चव्हाण
विभाग प्रमुख

दूरध्वनी क्र. ०७२४-२२५६००१
ई-मेल :hdahdspdkv@gmail.com

जा.क्र.वि.प्र./पसदुशा/वाहतूक/दरपत्रक/ ५४० /२०२५ दिनांक : ०२/०९/२०२५

### दरपत्रक सुचना

**विषय :** पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., येथे मुरघास करणेकरिता ठेका/कंत्राटी पद्धतीने **'भाडे तत्वावर कडबा कटरचेदर पुरविणेबाबत'** चे दर पुरविणेबाबत बंद पाकीटात दरपत्रक मागविणेबाबत ...

1. प्रक्षेत्रावरील हिरव्या ज्वार/मका चा-याची कुट्टी करण्याकरिता लागणा-या कडबाकटर, इंजिन, इंधन, मजूर तसेच कुट्टी मूरघासच्या खड्यात भरून देण्यासह या सर्व कामाचे एकत्रित दर प्रति एकर प्रमाणे सोबत जोडलेल्या दरपत्रकामधे भरून दरपत्रक सादर करावे.
2. कडबा कटर (Chaff Cutter) सुस्थितीत असणे गरजेचे राहील. मुरघासचा खड्डा हा विहित वेळेत पूर्ण भरणे गरजेचे असल्यामुळे कडबा कटर बंद पडणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. बंद पडल्यास दुरुस्तीची जबाबदारी कडबाकटर धारकाची राहील तसेच दुरुस्त न झाल्यास लगेच दुसरे कडबा कटर आणून कुट्टीचे काम सुरु करावे लागेल. कामे आखून दिलेल्या वेळेतच पूर्ण करावी लागतील.
3. विभागावरील मुरघास खड्याची क्षमता २०० ते २५० मे.टन असून दिलेल्या वेळेत सदर मुरघास खड्डा भरावा लागेल. गरज पडल्यास दोन कडबा कटर मशीन लागू शकतील.
4. संपूर्ण हिरव्या चा-याची कुट्टी करून देणे बंधनकारक राहील. मधातून काम सोडून जाता येणार नाही. गेल्यास केलेल्या कामाची रक्कम मिळणार नाही.
5. सदर दरपत्रक **विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला** यांचे नावे सादर करावे व लिफाफ्यावर ***'हिरव्या चा-याची कुट्टी करणेकरिता कडबा कटरचे दरपत्रक'*** असा स्पष्ट उल्लेख करावा.
6. विहित नमुन्यातील दरपत्रक कार्यालयीन वेळत स. १०.३० ते सा. ५.३० वाजेपर्यंत बंद पाकीटातच स्वीकारण्यात येतील.
7. दरपत्रक सादर करण्याची **अंतिम तारीख दि. १२.०९.२०२५** असून दरपत्रक त्याच दिवशी सा. ५.३० वा. मा. विभाग प्रमुख यांच्या कार्यालयात मंजूर समिती समक्ष उघडण्यात येतील.
8. नमूद केलेले दर हे दरपत्रक मंजूर झाल्यापासून पुढील सहा महिन्याच्या कालावधीकरीता ग्राह्य राहतील.
9. कडबाकटरवर लागणारे मजूर, ऑपरेटर ई. कडबाकटर धारकांचे राहतील. सदर मजुरांची सर्वस्वी जबाबदरी कडबाकटर धारकाची राहील. मजुरांच्या कोणत्याही प्रकारच्या होणा-या हाणीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
10. मूरघास खड्डा भरण्याचे काम विहित वेळेत पूर्ण न केल्यास कामाचे आदेश रद्द करण्याचा अधिकार विभाग प्रमुखास राहतील.
11. कडबाकटरपर्यंत ज्वार/मक्याची वाहतूक करून देण्यात येईल.
12. कार्यालयात केलेल्या कामाचे कोणतेही प्रमाणपत्र मिळणार नाही.
13. कडबाकटरणे केलेल्या कुट्टीची शहानिशा करुन व कार्यालयीन प्रकियेनंतरच देयके काढण्यात येतील.
14. दरपत्रक विहित नमुन्यात नसल्यास दरपत्रक नामंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना राहतील.
15. दरपत्रकातील अधिक माहितीकरीता विभाग प्रमुख, पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

विभाग प्रमुख
पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# दरपत्रक

(FORM OF QUOTATION)

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील सन २०२५-२६ मधील प्रक्षेत्रावरील खरीप हंगामातील ज्वार/मका पिकाचा मुरघास तयार करण्यासाठी हिरव्या चा-याची कुट्टी करणेकरिता **'भाडे तत्वावर कडबा कटरचे दर पुरविणेबाबतचे'** दरपत्रक.

| **अ. क्र.** | **कामाचे विवरण** | **दर प्रति एकर (रुपये)** |
|---|---|---|
| 1. | प्रक्षेत्रावरील हिरव्या ज्वार/मका चा-याची कुट्टी करणेकरिता कडबाकटर चे दर (कडबा कुट्टीसाठी लागणा-या कडबाकटर, इंजिन, इंधन खर्च, चाफ कटर ऑपरेटर तसेच कुट्टी मुरघासच्या खड्यात भरून देण्याकरिता लागणा-या मजुरांच्या मजुरीसह) | |

निविदेमधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:

दिनांक :

सही व शिक्का